


बुक पोस्ट


oikos
For Ecological Services

२१०, सिध्दार्थ टॉवर्स, कोथरूड, पुणे ४११०२९.
फोन : (०२०) २५४५१८७५, २५४६६९५९
e : oikos@oikos.in  w : www.oikos.in


प्रति,



भेंड

प्रिय मित्र,

नमस्कार !

सह्याद्रीच्या कुशीत वसलेले जलाशय आणि काठाने उलगडत जाणाऱ्या डोंगर-दऱ्यांचे आपण भागीदार ! इथला निसर्गरम्य प्रदेश, शांतता, पक्षी, दुर्मिळ वनस्पती यांचे पर्यटकांना आकर्षण न वाटले तर नवलच. ही निसर्गसंपत्ती जपण्यासाठी आणि वाढविण्यासाठी एक आवाहन...

आपण इथे जमीन घेऊन तिचा विनियोग घरे, रस्ते, रिसॉर्ट याकरता करणार असाल. पण मनात या निसर्गाविषयी प्रेम आणि आपुलकी असल्यामुळेच इथे इतक्या दुर्गम भागात येण्याचे आपण ठरवले असेल. गेली अनेक वर्षे या भागांमधून फिरताना निरीक्षलेल्या काही मुद्द्यांकडे आपले लक्ष वेधण्यासाठी हे पत्र तुम्हांस पाठवत आहोत.

## इथला निसर्ग छोट्या छोट्या कृतीतून जपण्याकरीता काही मुद्दे:

सह्याद्रीमध्ये अनेक दुर्मिळ जाती-प्रजाती आढळतात. आपल्याच नकळत जमिनीच्या विकासामध्ये या कमी अथवा नष्ट होऊ शकतात. एखादे दुर्मिळ ऑर्किड किंवा पुराणवृक्ष असेल तर ते जपणे आपल्याच हाती आहे.
याबद्दल आधिक माहिती करून घेऊन त्यांना जपू या !

निसर्ग परत हिरवागार होण्यासाठी आपण अनेक प्रकारची झाडे नक्कीच लावत असणार. पण यात निवड करताना देशी/स्थानिक झाडांनाच प्राधान्य दिल्यास नैसर्गिक साखळी अबाधित राखण्यास नक्कीच जास्त मदत होईल. नर्सरीमध्ये येणाऱ्या नवनवीन जातींपेक्षा इथल्या मूळच्या ऐन, आंबा, जांभूळ यांना प्राधान्य देऊया. कुठल्या प्रजाती लावण्यास योग्य आणि कुठल्या अयोग्य याची यादी आपल्या सोई करता देत आहोत.



कुर्डू



सोनकी

सुंदर दिसणारी फुलझाडे मन प्रसन्न करतात. पण त्यातील काही वर्षायू वनस्पती आपल्या सह्याद्रीच्या जैवविविधतेला मारक ठरतात. यात अग्रेसर म्हणजे ऑक्टोबरमध्ये सर्वत्र दिसणारे, अत्यंत शोभिवंत, केशरी फुलांचे कॉसमॉस. ही वनस्पती केवळ पावसाळ्यात उगवते, फुलते आणि बिया टाकून मरून जाते. पण ती अक्षरश: फोफावते आणि परदेशी असल्यामुळे तिला काबूत ठेवणारे शत्रू, किटक आपल्या नैसर्गिक साखळीत नाहीत. हिच्या बिया मुद्दाम उधळल्या जातात. पण केवळ १५ दिवसांच्या सौंदर्यामुळे आपल्या नैसर्गिक साखळीचे खूप नुकसान होते. निसर्गत: उगवणारे सोनकी, तेरडा, कुर्डू यासारखी रानफुले या कॉसमॉसच्या रेट्यापुढे टिकू शकत नाहीत. म्हणूनच अशा वनस्पती न लावणे आणि चुकून उगवून आल्यास तिचे समूळ उच्चाटन करणे हे निसर्ग राखण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. अशा परदेशी वनस्पती/झुडुपे मुद्दाम आणून लावणे नक्कीच टाळू या.



तेरडा

या बरोबरीने माती व जलसंधारण, ओढ्यांचं पुनरुज्जीवन, जमिनीवरील गवत व इतर झाडोऱ्याला संरक्षण, जमिनीचं पर्यावरणपूरक नियोजन इ. गोष्टी केल्यास निसर्गाला नक्कीच मदत होईल.

आपल्या सभोवतालच्या निसर्गाकरता, तो राखण्याकरता या काही सोप्या कृती आहेत. निसर्ग टिकवणे, वाढवणे आपण सर्व मिळून करूयात. आपल्याला याविषयी अजून जाणून घ्यायचे असल्यास जरुर संपर्क करा.

निसर्गाकरताच,
आपले,
ऑयकॉस सदस्य.


स्थानिक झाडांच्या रोपांची यादी www.oikos.in/pages/nursery.htm
अधिक माहितीसाठी येथे नोंद करा www.oikos.in/pages/register.htm

## स्थानिक वनस्पती

- बकुळ
- बहावा
- पळस
- कदंब
- करंज
- शिसम
- शिवण
- उंबर
- सातवीण
- जांभूळ
- भेंड
- आंबा

## परदेशी वनस्पती

- रेन ट्री
- ॲकेशिया
- मॅन्जीयम
- सुबाभुळ
- निलगीरी
- ग्लिरीसीडिया
- कॉसमॉस
- गुलमोहोर
- काशीद
- सिल्व्हर ओक
- सुरु
- अशोक





Kuda

Dear Friend,

Namaskar !

You are a part of rolling hills along beautifully spread backwaters nestled in the heart of Sahyadri mountains. The beautiful landscape, peace, chirping birds always attract a lot of tourists & city-dwellers. You might have purchased the land here for farmhouse, or resort. But your love for nature & urge to be with it must have compelled you to choose this remote & rough terrain. Here is a small appeal to conserve & enhance this natural wealth...

During extensive travel in these hills for few years we encountered various interesting facts & observations that we would like to put forth through this letter.

## Few suggestions for 'Conserving Nature through small acts',

Lot of rare & endemic plant species are found in this region being a part of Sahyadri - Western Ghats. Unknowingly, during the course of development such species are removed. It can be a beautiful orchid or an old growth tree. Responsibility of conserving such species lies with all of us. **Let's get acquainted with the wealth on your land & protect them.**

You must be planting a lot of trees to make the area green. But most of the times non-native species are selected for the plantations. If you select native, it will help in keeping the natural cycle intact. Instead of planting newer foreign species arriving in nurseries. **Let's prefer the ab-origins of this region like Ain-Amba-Jambhul !** Refer to the partial list for your convenience.





Cosmos

Flowers are beautiful. But some of the seasonal non-native species prove dangerous to our unique biodiversity. Top on the list is October flowering, attractive, orange coloured 'Cosmos'. This plant germinates in monsoon, flowers & dies after seeding. But it invades the landscape. The 15-day mesmerizing flowering proves dangerous to our natural heritage. Naturally occurring herbs like Sonaki, Terada, Kurdu get a back seat due to this invading cosmos. That's why removing such species should be a top most priority. Easy way to do this is cutting the flowers.

**Let's avoid such non-native plants !**

**Along with this, soil and water conservation, stream restoration, protection to existing grasses and vegetation and ecological planning of the land will also rejuvenate natural systems.**

**These are few tips to conserve & restore the natural capital around us. Let's all join hands to preserve it. Do call us to know more.**

For nature,

Oikos team.

Refer to available saplings list at **www.oikos.in/pages/nursery.htm**
To know more, register yourself at **www.oikos.in/pages/register.htm**

### Natives

- Bakul
- Bahawa
- Palas
- Kadamb
- Karanj
- Shisam
- Shivan
- Umbar
- Satwin
- Jambhul
- Bhend
- Amba

### Non-Natives

- Rain tree
- Acacia
- Mangium
- Subabhul
- Nilgiri
- Gliricidia
- Cosmos
- Gulmohor
- Kashid
- Silver oak
- Suru
- Ashok



oikos
For Ecological Services